e-ISSN 2278-5655 Impact factor 2.125
UGC Approved Online Journal (Sr no 48178 48818)
AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाची प्रशासकीय चिकीत्सा

प्रा. संदिप शामराव भोजने
मत्स्योदरी कला महाविद्यालय, तिर्थपूरी

**प्रस्तावना ( Introduction ) :**

कोणत्याही समाजाचे सर्वंकष भवितव्य हे त्याच्या सामाजिक जाणीवा व सामाजिक उत्थनाची कांतीभूत वैचारिकता यातून उदास येत असते. समाजाला सामाजिक परिवर्तनाच्या वाटेवर आणण्यासाठी त्या समाजाच्या सामाजिक वास्तवतेचे आकलन करुन घेणे महत्त्वाचे असते. त्याशिवाय त्या समाजाच्या उत्थानाच्या व विकासाच्या परिकल्पना मांडणे योग्य ठरणार नाही. रुढी, प्रथा, परंपरा, सामाजिक चालिरिती, सामाजिक बंधणे व जीवन जगण्याच्या पध्दती या सर्व बाबी त्या – त्या समाजाचे स्वरुप निश्चित करण्यास कारणीभूत ठरतात व त्यावरुनच त्या समाजाची गतिशिलता, सामाजिकतेचे भान आणि समाज विचार स्विकारण्याची क्षमता याची प्रचिती होत असते. म्हणून समाजाचा सामाजिक दर्जा, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय प्रगत्ती त्यांची जीवन जगण्याची पध्दत याचा अभ्यास केल्याशिवाय कोणत्याही समाजाच्या भवितव्याची कल्पना करता येत नाही. भारत हा विविध जाती धर्म आणि पंथानी नटलेला देश आहे. या भारतात जवळ – जवळ साडेचार हजाराहून अधिक जाती आहेत. त्यात देशभरात अकराशेहून अधिक अनुसूचित जाती आहेत. याच जाती समूहातील एक मागासवर्गीय समाज म्हणजे 'मातंग' समाज होय. मातंग समाजात आजही रुढ, प्रथा, परंपरा आणि रुढ अज्ञानावर आधारित विचारप्रवाह परंपरेच्या पूर्वग्रहातून चालत आलेले दिसून येतात. परंपरावाद व जुन्या अंधश्रध्दा चालिरितीचे अस्तित्व आजही या समाजात पाहावयास मिळते. या अधपतनाच्या शिळया शिदोरीवर मातंग समाजाची वैचारिकता आजही पोसली जात आहे. 21 व्या शतकात वावरत असताना हा समाज विकासाच्या अनेक संधीपासून वंचित राहावा ही बाब चिंताजनक वाटते म्हणून यावर विचार होणे आवश्यक आहे.

समाजाचे सामाजिक भवितव्य ठरविणारा विचार हा स्थितीवादी व परंपरावादी नसतो तर तो काळानुरुप बदलणारा असतो. मागासवर्गीयातील मातंग समाजाचे समाजभान आजही काळानुरुन सामाजिक व सांस्कतिक बदेल स्विकारण्याच्या मनस्थितीत नाही. पण असे असले तरी या समाजाच्या स्थितीचा आज विचार केला तर त्यांच्यात ब–यापैकी सामाजिक, राजकीय व आर्थिक बदल घडून आले असले तरी मात्र ते पूरेसे नाहीत. मातंग ही महाराष्ट्रातील अस्पृश्यातील अस्पृश्य जात. संस्कृत वाङ:मयात या लोकांना 'मातंग' असे म्हटले जाते. भारतात यांची वस्ती महाराष्ट्र, मध्यप्रदेष, गुजरात व म्हैसूर या राज्यात आहे. संख्येच्या



48

बाबत महाराष्ट्रात अनुसूचित जातीत मातंग या प्रवर्गाचा दुसरा नंबर आहे. परंतु अनुसूचित जातीत समाविष्ट होणा—या इतर समाजाचा तुलनेत मातंग या जातीचा पाहिजे तेवढा विकास झाल्याचे दिसत नाही. महाराष्ट्रात अनुसूचित जातीची मातंग या जातीचा पाहिजे तेवढा विकास झाल्याचे दिसत नाही. महाराष्ट्रात अनुसूचति जातीची एकूण लोकसंख्या 58 टक्के आहे. त्यात बौध्द 35.12 टक्के, मातंग 32.65 टक्के तर चांभार तथा मोची 22.6 टक्के एवढे आहेत. इतर अनुसूचित जातीमध्ये 'मातंग' समाजाची लोकसंख्या जास्त असली तरी इतर समाजाच्या तुलनेत हा समाज कमालीचा मागे असल्याचे दिसते. ही बाब चिंताजनक वाटते. म्हणून यावर विचार होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील 'मातंग' समाज हा शिक्षण व राजकारणाच्या क्षेत्रातही आजतागायत इतर सर्व अस्पृश्य जातीपेक्षा मागासलेला आहे. गावगाडयाच्या जुन्या रितिरिवाजाप्रमाणे आणि प्राचीन परंपरेने घालून दिलेल्या प्रथेप्रमाणे आजही त्यांचे मार्गकमण चालू आहे. त्यात काही विशेष फरक पडल्याचे दिसत नाही.

परोपकार दया, माया आणि सहिष्णूता या गोष्टीसाठी भारतीय संस्कृती ही युगा — युगापासून श्रेष्ठ आहे. आजही भारतीय संस्कृतीचे जगात गोडवे गायले जातात त्या त्या महान संस्कृतीच्या देशात शुद्र व अस्पुष्य म्हणून गणल्या गेलेल्यांना धडधडीत माणूस न समजता माणुसकीच्या मुतदेह बनून ठेवलेला होता. हा या संस्कृतीचा पाशावियतेचा धडधडीत नमूना आहे. प्राण्यापेक्षाही तिरस्कुत व वाईट जीवन येथील मागासवर्गीयातील 'मातंग' समाजाला देणारी ही समाजव्यवस्था म्हणजे येथील प्रस्थापितांचे व शासन व्यवस्थेचे भयंकर असे पातकी षढयंत्र होते. वृक्ष, कुत्रे व गिधाडे यांच्या सावलीत येथील उच्चभ्रु प्रस्थापित सवर्णीय माणूस कधी बाटत नव्हता, परंतु मातंग समाजालाच्या सावलीने व थुंकीने मात्र त्यांना विटाळासारखा महारोग जडत होता. हे पापपुराण एवढयापुरतेच थांबले नाहीतर निसर्गाने मानवी जीवन सुखमय करण्यासाठी दिलेली जीवनदायी अमृततुल्य पाणीसुध्दा मातंगाच्या स्पर्शाने बाटत होते. त्या निरामय पाण्यापासूनही मातंग समाजाला वंचित करुन ठेवले होते. आजही या समाजाचा छळ, अवमान व तिरस्कार केला जातो. एकूण समाजात अनेके सामाजिक परिवर्तने घडून ओली असली तरी त्यांची 'मातंग' समाजाबाबतची भूमिका मात्र फारशी बदलेली जाणवत नाही, म्हणून ही बाब चिंताजनक वाटते.

स्वातंत्र प्राप्तीनंतर तत्कालीन समाज व्यवस्थेने दुर्लक्षित केलेल्या दुर्बल समाज घटकामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक दरी भरुन काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 1985 मध्ये लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले आहे. या महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील 'मातंग' समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासास हातभार लावून त्यांना स्वावलंबी बनवणे हा या महामंडळाचा उददेश आहे. समाजातल्या लक्षावधी मातंग बांधवाना या महामंडळाच्या योजनांचा फायदा मिळावा व सध्या मिळतही आहे. पिढीजात धंदासोडून नव्या युगात सामर्थ्यशाली बनण्यासाठी महामंडळ



49

इच्छुकांना व्यवसाय सुरु करण्यासाठी, व्यापार भांडवल कर्ज, साधनसामुग्री, तांत्रिक व व्यवस्थापकीय साहय पुरविण्यात या महामंडळाचे मोठे योगदान आहे. या महामंडळाच्या आजपर्यंतच्या प्रगतीचे मूल्यमापन केले असता मागील 32 वर्षात या महामंडळाने अनेक लहान मोठे उद्योजक निर्माण केल्याचे दिसते. दलित व उपलब्धता करुणे ज्यातून मागासवर्गीयाच्या आर्थिक विकासाबरोबर सामाजिक विकास साधला जाईल. यासाठी हे महामंडळ कटीबध्द असल्याचे दिसते. समाजातील दारिद्रय रेषेखालील जीवन जाईल. यासाठी हे महामंडळ कटीबध्द असल्याचे दिसते. समाजातील दारिद्रय रेषेखालील जीवन दुर्बल अनुसूचित जातीतील मातंग समाज व त्यांअंतर्गत असलेल्या मांग, मातंग, गारुडी या दहा पोटजातीच्या व्यक्तींना या दहा पोटजातीच्या व्यक्तींना या महामंडळाकडून लाभ दिला जातो. यासाठी सुरुवातीला या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल 2.50 कोटीचे होते. परंतु आता शासनाच्या नवीन निर्णयानुसार या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल 10 कोटी रुपये निश्चित केलेल आहे. 11 जून 1985 ते 31 मार्च 1996 अखेर महाराष्ट्र शासनाने 222.70 लाख रुपयाचे भाग भांडवल मंजूर केले आहे. या महामंडळाचे महाराष्ट्रातील 23 जिल्हयात स्वतंत्र जिल्हा कार्यालये कियान्वित केली असून उर्वरित जिल्हयामध्ये लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या उपलब्ध कर्मचा–यांमधून एक किंवा दोन कर्मचारी देण्यातम आले आहेत. परंतु आजपर्यंतची या महामंडळाची स्थापना होउन जवळ–जवळ 32 वर्षाचा काळ उलटला पण या काळात मागासवर्गीय मातंग समाजाला इतर समाजाच्या अवस्थेपर्यंतदेखील आणले शक्य झाले नाही. आजपर्यंत या महामंडळाच्या माध्यमातून करोडो रुपये खर्च करण्यात आले., परंतु अपेक्षित बदल मात्र होउ षकले नाहीत. मातंग समाजाच्या विकासासाठी आवश्यक लागणारा निधी व या महामंडळाकडून उपलब्ध होणारा निधी यातही मोठी तफावत दिसून येते. सामाजिक सुधारणेच्या नावाखाली मागासवर्गीय व दलित समाजावर करोडो रुपये खर्च केल्याचे कागदोपत्री आकडे दाखवून मातंग समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केले परंतु 21 व्या शतकातदेखील या समाजाच्या मूलमागी समस्या तशाच आहेत ही बाब चिंताजनक वाटते म्हणून लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाचा प्रशासकीय अभ्यास, विशेश संदर्भ जालना जिल्हा प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

21 व्या शतकात वावरत असतांना मातंग समाजाच्या प्रगतीकडे दुष्टिक्षेप टाकल्यास निदर्शनास येते की, या समाजात आजही हिंदु धर्म प्रणीत ही भावनेची मानसिकता कायम आहे. रुढी, प्रथा, परंपरा, अंधविश्वास या प्रथा आजही या समाजात अस्तित्वात आहेत. कर्जबाजारी होउन आपली कुवत नसतांनाही ऋण काढून सैण साजरे करण्याच्या प्रथा जशास तशा कायम आहेत. शिक्षणाचे प्रमाणदेखील अगदी नगण्य आहे. म्हणून मातंग समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती कशी आहे या समाजात जुन्या अंधश्रध्दा व चालिरितीने अस्तित्व आजही आहे का या समाजाचे समाजमन काळानुरुप सामाजिक व सांस्कृतिक बदल स्विकारण्याच्या मनस्थितीत आहेत का समाज परितर्वनातून मातंग समाजात काही लक्षणीय स्थित्यंतर घडुन



50

आले का ? जातीय अभिनिवेशाच्या पलिकडे जाउन समाज मंथनातून काही वैचारिक क्रांतीकडे या समाजाची वाटचाल झाली आहे का ? या समाजाच्या विकासात येणा–या अडचणी कोणत्या आहेत ? या समाजाची दैनंदिन जीवनशैली कसी आहे ? हा समाज प्रामुख्याने कोणता रोजगार करतो ? मातंग समाजाच्या विकासासाठी शासन व प्रशासकीय स्तरावर कोणते प्रयत्न केले जातात ? मातंग समाजाच्या विकासाठी महाराष्ट्र शासनाने निर्माण केलेला लोकशाहीरव अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाबाबत जनतेमध्ये जागरुकता आहे. आजपर्यंत या महामंडळाच्या विविध योजनांचा किती जणांनी लाभ घेतला ? त्यांना विविध योजनांचा लाभ घेताना कोण–कोणत्या अडचणी येतात ? या महामंडळामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करताना कोणत्या समस्याना सामोरे जावे लागते ? या महामंडळात राजकीय हस्तक्षेप होतो का ? या महामंडळाकडे उपलब्ध असलेला निधी व आवश्यक असलेला निधी यात तफावत आहे ? या महामंडळात लाईन ( Line ) घटक आणि स्टॉफ घटक ( Staff ) पुरेसा आहे का या महामंडळातील नियोजन व समन्वय कसे आहे ? आजपर्यंतची या महामंडळाची प्रगती कसी आहे ? या व यासारख्या असंख्य समस्यांचा शोध घेण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाचा प्रशासकीय अभ्यास विशेष संदर्भ जालना जिल्हा या प्रस्तुत विषयाची निवड संशोधनासाठी करण्यात आली आहे.

## संशोधनासाठी उदिदष्टे ( Objectives of Research )

प्रस्तुत अध्ययनासाठी खालील उदिष्टे निश्चित करण्यात आलेली होती.

1. मराठवाडयातील मातंग समाजाची, आर्थिक व शैक्षणिक स्थिती जाणून घेणे.
2. लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाची पार्श्वभूमी जाणून घेउन या महामंडळाचे उददेश व व्याप्ती तपासणे.
3. लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या संघटन व कार्यप्रणालीचा अभ्यास करणे.
4. लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या अंमलबजावणीत येणा–या समस्या व अडचणी जाणून घेणे.
5. लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या मराठवाडयातील मातंग समाजाच्या विकासावर पडलेला प्रभाव तपासणे.
6. महामंडळाच्या प्रभावी योजनेच्या अंमलबजावणीसाठी दिशा निर्देष करणे.



51

निष्कर्ष :

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळामार्फत राबवल्या जात असलेल्या योजनांची फलनिष्पती व मूल्यमापन प्रशासकीय अंगाने केलेले आहे. संशोधन क्षेत्रातील दुयम साधनांबरोबरच प्रश्नावली, मुलाखती व अनुसूचीव्दारे प्राप्त केलेल्या अनुभवजन्य माहितीच्या आधारे विश्लेषण केले असता सदरील संशोधन कार्याच्या शेवटच्या टप्प्यात पुढील निष्कर्ष निदर्शनास आली आहेत.

1. सामाजिक परिवर्तनाच्या संकमण अवस्थेच्या काळात आजही मागासवर्गीय समाज विशेषतः मातंग समाज जातिभेदाचा, जातीय वादाचा व अस्पश्यतेचा शिकार झाल्याचे दिसते. आजही या समाजाला इतर समाजाला इतर समाजाच्या अवस्थेपर्यंत व त्यांच्या प्रतिष्ठेच्या पातळीपर्यंत आणने प्रशासनाला शक्य झाले नसल्याचे दिसून येते.
2. लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक महामंडळामुळे जालना जिल्हयातील मातंग समाजातील बहुतांश कुटुंबाचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास होउन बहुजन समाजात आर्थिक स्थिरता निर्माण होण्यासाठी हे महामंडळ महत्त्वपूर्ण ठरत आहे.
3. लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळामुळे दलित व मातंग समाजातील बांधवांना उद्योगी बनवण्यासाठी मदते होत असली तरीही त्यासाठी आवश्यक असणारा निधी व महामंडळाकडे उपलब्ध असणारा निधी यात तफावत असल्याचे दिसून येते.
4. या महामंडळामार्फत राबविल्या जाणा–या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये प्रत्यक्ष स्थानिक पातळीवर स्थानिक राजकारण आणि जातीय राजकारणाचाा कमी – अधिक नेहमी प्रभाव दिसून येतो. अशा स्थानिक स्तरावरील राजकारणाचा आणि समाजातील प्रस्थापित अभिजन वर्ग पुढारलेला वर्ग यांचा योजनेच्या अंमलबजावणीत अडसर ठरत आहे.
5. मातंग समाज विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या या महामंडळाच्या विकास प्रक्रियेला गतिशील ठेवण्यासाठी राजकीय पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी या दोन्ही अधिकारी या दोन्ही गटात अभद्रयुती होउन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होताना दिसतो.
6. लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळातार्फत राबविल्या जात असलेल्या योजनांची आखणी व अंमलबजावणी एकात्मिक स्वरुपाची नाही. त्यांच्या या योजनांच्या अंमलबजावणी प्रक्रियेत जनसहभाग हा अपूरा वाटायला लागतो.
7. या महामंडळामार्फत राबविण्यात येणा–या योजनांमुळे मागासवर्गीयांच्या विशेषतः मातं समाजाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास होत असला तरीही लाभधारकांना या विविध योजनांचा लाभ घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.



S2

8. लोकशाहीर अण्णाभाउ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा—या योजना अंमबजावणीत समन्वय व नियोजनाचा अभाव आहे.
9. या महामंडळाच्या योजना अंमलबजावणीत राजकीय दबावातून अधिकारी कर्मचा—यांना योजना अंमलबजावणीसाठी निर्धारित केलेली विशिष्ट प्रकिया अथवा योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना डावलून इतरांना या योजनेचा फायदा दिला जात असल्याचे दिसून येते.
10. या महामंडळाच्या कार्यप्रमणालीसाठी व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारा लाईन घटक ( Line Agency ) व स्टाफ घटक ( Staff Agency ) हा अपूरा वाटायला लागतो.

संदर्भ ग्रंथसूची :

1. Gingan M.,L., ( 2008 ) 'The Economics of Development and Planning', Vrinda Publication Delhi - ( Ist Edition )
2. Patwardhan Sunanda, ( 1973 ), 'Change among India's Harijans', orient Longman, Ltd. New Delhi.
3. Nanjundayya H.,V., and Anantankrishna Iyer, ( 1931 ), 'The Mysore Tribes and Castes' Mysore university Mysore, Vol - IV.
4. Govt.of India, ( 2001 ), Planning Commission report of the task force ion employment, opportunities, New Delhi.
5. Datta Rudra and Sundaram, ( 2005 ), 'K.P.M. India Economy's' chand and chand Company Ltd. New Delhi, ( 53rd Adition ).
6. Misra and puri, ( 2008 ), 'Indian Economy Its Development Experiences', Himalaya Publishing House New Delhi ( 26th Edition )
7. Goyal B.,R., ( 1981 ), 'Educating Harijans,' Dhawn Printing Works, New Delhi.
8. Ghurye, G.,S., ( 1969 ), 'Caste and Race in India', Popular Prakashan Bombay.
9. शिंदे वि.रा., 1933 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न', नवभारत ग्रंथमाला कार्यालय, नागपूर



53

10. चंद्रकांत वानखेडे, संपादीत 1981, मातंग प्राचीनता आणि सामाजिक परिवर्तनाच्या दिशा, अण्णाभाउ साठे साहित्य प्रतिष्ठान, नागपूर

11. सोमवंशी बी.,सी. 1989, 'भारतीय जातीसंस्थेत मातंगाचे स्थान आणि महार – मांग संबंध', आनंदा प्रकाशक, औरंगाबाद

12. चौथाईवाला सुरेश, 2015, उठ मातंगा 'उठ तू मेलास की काय,' ? लहूजी प्रकाशन, औरंगाबाद.

13. मुनगेकर भालचंद्र 2011, आर्थिक सुधारणा आणि विकासाचा मानवी चेहरा लोकवाङःमय गृह मुंबई.

14 पाटील मनोज, 2007 'नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकासाच्या योजना' चौधरी लॉ पब्लीशर्स पुणे.

15. सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र सुवर्ण कोणाच्या खिशात 2010, जनशक्ती प्रकाशन मुंबई



54